1 8 AUG 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात राष्ट्रध्वजास वंदन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात ७८ वा स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणात राष्ट्रध्वजास वंदन करण्यात आले. राष्ट्रीय छात्रसेनेच्या परेडद्वारे राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली. यावेळी राष्ट्रगीत व विद्यापीठ गीत यांचे सामूहिक गायन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले.

यावेळी विविध ठिकाणी 'आजादी का अमृत महोत्सव' उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे 'सेल्फी पॉईंटस्' तयार करण्यात आले होते. तत्पूर्वी, आयोजित करण्यात आलेल्या स्वातंत्र्यदिन रॅलीस कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी फ्लॅग-ऑफ करून रॅलीमध्ये सहभाग घेतला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. सागर डेळेकर, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, वसंत एकले आदी उपस्थित होते.

18 AUG 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी दोन तासांत बांधले पाच संगणक

## इलेक्ट्रॉनिक्स, तंत्रज्ञान विभागाचा संयुक्त उपक्रम

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : कौशल्यवाढीला चालना देण्याच्या उपक्रमाअंतर्गत शिवाजी विद्यापीठाने बी. टेक. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्सच्या विद्यार्थ्यांनी दोन तासांत पाच संगणक बांधले. दूरशिक्षण केंद्रातील दैनंदिन कामकाजासाठी या संगणकांचा वापर करण्याचा निर्णय कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी घेतला आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागातून संगणक बांधण्याची संकल्पना मांडली. त्यामागील उद्देश विद्यार्थ्यांना संगणकाच्या सुट्या भागांची ओळख व्हावी, त्याची कार्यप्रणाली



कोल्हापूर : कौशल्यवाढ उपक्रमाअंतर्गत शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी पाच संगणक तयार केले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

समजावी आणि विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतानाच स्वतः संगणक बांधण्याचे कौशल्य प्राप्त करावे, असा होता. त्यानुसार उपक्रमात इच्छुक विद्यार्थ्यांचा गट केला. त्यात बी. टेक. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स अभ्यासक्रमाचे विद्यार्थी होते. प्रायोगिक तत्त्वावर पाच संगणक बनविण्यासाठी या विद्यार्थ्यांचे इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागात एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर घेतले. त्यांना संगणकासाठी आवश्यक सुट्या भागांची माहिती दिली. संगणक बांधणीचे प्रात्यक्षिक दिले. विद्यार्थ्यांनी संगणक बांधणी, ऑपरेटिंग सिस्टीम इंस्टॉलेशनच्या प्रात्यक्षिकाचा अनुभव घेतला. त्यानंतर त्यांनी दोन तासांमध्ये पाच संगणकांची बांधणी केली.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग प्रमुख डॉ. पी. के. गायकवाड, तंत्रज्ञान अधिविभागप्रमुख डॉ. एस. एन. सपली, एम. के. भानारकर, एस. एम. मस्के उपस्थित होते. उपक्रमाचे डॉ. एस. ए. शिंदे, एस. बी. चव्हाण समन्वयक होते.

> ‘‘ विद्यार्थ्यांमधील कौशल्यवाढीला बळ देण्यासाठी संगणक बांधणीचा उपक्रम राबविला. त्यात शिक्षक, विद्यार्थ्यांनी चांगले काम केले. अगदी माफक खर्चात संगणक तयार झाले.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

पुढारी

संक्षिप्त

## विदेशी भाषा प्रवेश; २४ पर्यंत अर्जाची मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातील रशियन, जर्मन, जपानी, पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी अर्ज भरण्याची मुदत २४ ऑगस्टपर्यंत आहे. विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे एक वर्ष कालावधीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्यात येतात. प्रवेश क्षमता प्रत्येकी ५० आहे. बारावी उत्तीर्ण किंवा समकक्ष प्रवेशार्हता आहे. इतर कोणतेही शिक्षण घेत अथवा नोकरी करत हे अभ्यासक्रम करता येतात.